# गड आला, ...पण सिंह गेला!

हरि नारायण आपटे

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गड आला, ...पण सिंह गेला! : हरि नारायण आपटे**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये १२०/-

# गड आला, ...पण सिंह गेला!

## १. कमलकुमारी

गहन अरण्य-अरवली पर्वताच्या एका भागामधले ते अरण्य; अर्थात् त्यात मोठमोठ्याल्या वृक्षांची विलक्षण दाटी होती, आणि मध्यान्हीवर सूर्य आला असताही त्या वृक्षांच्या निबिड छायेतून त्याच्या प्रकाशाचा आत प्रवेश होणे केवळ दुरापास्त होते. वास्तविक पाहता या अरण्यात भिल्लांखेरीज कोणीसुद्धा मनुष्यप्राणी राहण्याचे साहस करीत नसे. नाही म्हणावयास क्वचित् स्थळी गुहेतून एखाददुसरा सिद्धपुरुष आपले पुरश्चरण करीत बसलेला दिसत असे. परंतु साधारणतः नगरवासी मनुष्य कधी त्या भागात होता होईतो येत नसत. सृष्टीचे रौद्र व भयानक स्वरूप या ठिकाणी दिसे आणि त्यात ज्यावेळी क्रूर श्वापदे आपल्या भक्ष्यशोधार्थ इकडून तिकडे सैरावैरा हिंडताना भयंकर गर्जना करीत असतील तेव्हा तर ती रौद्रता विशेषच अनुभवास येई. तथापि अशा या अरण्यात शके १५९२ साली कार्तिक शुद्ध नवमीला प्रातःकाळी एक बैलाची गाडी चालली होती. तिच्याबरोबर चार केशरी पोषाख घातलेले रजपूत शिपाई व चार कालकूटापेक्षा कृष्णवर्ण व करालमुख असे भिल्ल होते. एक वृद्ध रजपूत अंगात केशरी झगा घातलेला, हाती केशरी रंगाच्या म्यानाचीच तलवार घेतलेला असा, मोठ्या थोरल्या घोड्यावर बसून पुढे चाललेला होता. त्याचा चेहरा भव्य, तेजःपुंज, परंतु वार्धक्याने आपली मुद्रा ठोकल्याकारणाने, सुरकुत्या पडलेला असा दिसत होता. तो यावेळी अतोनात चिंताक्रांत दिसला. काहीतरी दुःख होऊन त्याचे अंतःकरण अगदी करपून गेले असावे, असे स्पष्ट दिसत होते. त्या गाडीच्या योगाने, बैलांच्या घुंगुरमाळांनी व घोड्यांच्या टापांनी जो काय आवाज होता तो, किंवा प्रातःकाळ झाल्याकारणाने जागृत होऊन भक्ष्यार्थ वनसंचार करावयास जाण्यापूर्वी आपल्या

वासवृक्षांवरच बसून शब्द करीत असणाऱ्या पक्ष्यांचा श्रुतिमधुर किलकिलाट, यावाचून दुसरा कोणताही आवाज त्यावेळी होत नव्हता. त्या बैलगाडीबरोबर चाललेले लोक आपसात बोलत नव्हते. या बैलगाडीस बैलगाडी म्हणण्यापेक्षा रथ म्हटले तर विशेष शोभेल, कारण, ही प्राचीन काळच्या रथाच्या आकाराची व लहानसर असून हिच्या वरच्या बाजूस देवळाच्या शिखराच्या आकाराचा घुमट होता. घुमटावर सुंदर कळस आणि त्याच्या चारी कोपऱ्यांवरही कळस होते. सर्व रथावर चारही बाजूंनी पडदे सोडलेले होते. मात्र त्या पडद्यांच्या प्रत्येक बाजूला आत साधारण उंचीचे मनुष्य बसले असता त्यांच्या डोळ्यांच्या बेताला येईल इतक्या बेताची झरोक्यासारखी भोके असून त्यात जाळीदार कापड शिवलेले होते. यावरून अर्थातच आत कोणीतरी स्त्रिया असाव्यात असे अनुमान सहज येई. प्रातःकाळची वेळ असल्याकारणाने बैल मोठ्या हुशारीने व आपल्या घुंगरांच्या तालावर चालत होते. जनावरांखेरीज इतर कोणाच्याही अंगात हुशारी किंवा तोंडावर तजेला मुळीच दिसत नव्हता. प्रत्येक मनुष्य मोठा चिंताक्रांत दिसत होता. अर्थातच सभोवतालची वनशोभा त्यावेळी जरी मोठी प्रेक्षणीय होती तरी या मंडळींचे अंतःकरण अत्यंत दुःखित असल्याकारणाने त्यांचे लक्ष तिकडेसुद्धा जात नव्हते असे दिसते. त्यांचा मार्ग क्रमण्याचा झपाटा चालला होता.

सुमारे अर्धा प्रहर झाला तेव्हा तो पुढचा वृद्ध रजपूत आपला घोडा मागे वळवून एका रजपूत शिपायास हळूच म्हणतो, 'पद्मनाभजी, अजून ती जागा किती लांब आहे? तुझ्या सांगण्याप्रमाणे आपण यावेळी त्या जागी बहुतकरून येऊन पोहोचले असलो पाहिजे. पण अजून काही तू सांगितलेल्या त्या खुणा दिसत नाहीत. ते जर आपल्या टापूच्या बाहेर निघून गेले होते, तर वीरसिंहाला तरी त्यांचा इतका पाठलाग करण्याची काय जरूरी होती? परंतु कर्माच्या पुढे कोणाची धाव चालणार! त्याचे कर्म ओढवले. राजसिंहमहाराजांची आज्ञा केवळ आपापल्या हद्दी सांभाळाव्यात एवढीच आहे. पण वीरसिंह जातीचा शूर, अविंध पाहिला की, त्याला असे स्फुरण चढे, तेव्हा प्रसंग येताच त्यांना चेचून टाकण्यासाठी हद्द सोडून इतक्या दूरवर आला! पण तेवढ्यावाचून काय अडले होते?'

'संग्रामसिंहजी, वीरसिंहाची त्या वेळची वीरश्री काही विलक्षण होती. एखाद्या उत्तम शिकाऱ्याला काही वेळात काही मिळू नये, तो अगदी निराश होऊन परत जाण्याच्या विचारात आला असता त्याला एखादा भला थोरला हत्तीसारखा प्रचंड रानडुक्कर दिसावा, आणखी तो जसा त्याच्या पाठीस लागतो, तसे वीरसिंहजी त्या

मोगलांच्या पाठीस लागले. आज किती दिवस ते हद्दीला येऊन बसले असून मोगलांचे कोणी चिटपाखरूसुद्धा इक्डे आले नाही, म्हणून त्यांना अगदी वाईट वाटत असे. महाराज राजसिंहांनी त्यांना येथे पाठविल्या वेळेपासून त्यांची इच्छा ही की, आपण येथे आल्यासारखी काहीतरी चकमक उडून एक-दोन मोगलांच्या टोळ्या पकडून महाराजांकडे पाठवाव्यात. ते काही होईना, त्यांनी आम्हाला किती वेळा तरी टेहळणीसाठी दूरवर पाठविले. आम्ही जाऊन टेहळणी करण्यालासुद्धा कंटाळलो. पण कधी काही मागमूस नाही आणि परवा त्यांची तोंडे इकडे वळली आहेत, असे कळले, मात्र वीरसिंहाचे बाहू स्फुरू लागले. त्यांनी आपली शस्त्रास्त्रे घेतली. आमची मंडळी चटकन् जमण्यासाठी शिंगे फुंकली आणि आम्हाला घेऊन ते निघाले. तो मोगलांनी याच बाजूला मोर्चा फिरविलेला कळला आणि थोड्याच वेळात त्या शेरखानाच्या टोळीची आणखी आमची जुंपून खूप चकमक झाली. मोगलांनी आपली पाठ फिरविली. थोडासा त्यांचा पाठलाग करून सोडून द्यायचे; ते न करता वीरसिंहजी त्यांच्या मागोमाग एकटेच पार पुढे गेले. ते एकटेच आहेत असे पाहून कोणी उलटला की मध्येच कोठे कोणी छपून बसलेला होता, त्याने त्यांच्यामागून येऊन त्यांच्यावर हल्ला केला, काही सांगता येत नाही. पण आम्ही त्यांच्या मागोमाग जो पुढे जातो तो त्यांच्या अंगावर सुमारे पंधरा वार लागलेले आणि ते अगदी बेशुद्ध पडलेले दिसले. त्यांस शुद्धीवर आणण्याचे व जखमा बांधून रक्तस्राव कमी करण्याचे आम्ही पुष्कळ प्रयत्न केले, परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी त्यांच्या शवाला अग्नी देऊन आम्ही आपल्याकडे ही दुर्वार्ता सांगण्याला आलो. एकवार ते प्रेतच आपणाकडे घेऊन यावे असा विचार आमच्या मनात आला; पण सहा-सात दिवसांची वाट, तेथपर्यंत त्याला दुर्गंधी खचित सुटली असती; प्रेत तेथेच ठेवून येणे अर्थातच गैर म्हणून त्याला अग्नी दिला. आम्ही त्यांना 'आपण पुढे जाऊ नका' असे पुष्कळ सांगितले, पण त्यांनी ऐकले नाही. त्यांचे शौर्य जबर, साहसही जबर, पण त्यात दुराग्रहही फार झाला.'

हे पद्मनाभजींचे बोलणे चालले असता म्हातारा स्वस्थपणे ऐकत होता. मधून मधून त्याच्या डोळ्यांतून अश्रुबिंदूही बाहेर पडत; पण ते तसेच पडू देऊन तो आपल्या पुढच्या मार्गाकडे लक्ष देऊन चालला होता. पद्मनाभजींनी ही वीरसिंहाच्या मरणाची हकिकत त्यांना आता पहिल्यानेच सांगितली असे नाही, चवथ्या-पाचव्यांदा तर सांगितली असेल, पण म्हाताऱ्यास ती हकिकत ऐकण्याचा कधी त्रास वाटला नाही.

आपले ज्याच्यावर अत्यंत प्रेम ते माणूस मृत्यू पावले असता त्याच्या मृत्यूची हकिकत वारंवार कोणाला तरी सांगितल्याने किंवा कोणीतरी सांगू लागले असता ऐकल्यानेही एक प्रकारे मनास बरे वाटत असते. तीच स्थिती यावेळी संग्रामसिंहांची झाली होती.

ती गाडी व मंडळी आणखी काहीसा मार्ग आक्रमून पुढे गेली. ती मंडळी विशेष गर्द अशा झाडीत आली. तो तेथे एका ठिकाणी एक राखेचा ढीग दिसला. तितक्यात एक भिल्ल पुढे होऊन इकडे तिकडे पाहून एकदम म्हणाला, 'हीच ती जागा.' गाडी थांबली आणि त्या गाडीचे पडदे आतूनच कोणी दूर केले व एक सुमारे बावीस वर्षांची स्त्री आतून बाहेर तोंड काढून इकडेतिकडे पाहून खाली उतरली. तिची चर्या अतोनात दुःखित दिसली. ती उतरल्यावर तिने पुन्हा एकदा पडदा दूर करून हात पुढे करून दुसऱ्या एका तरुण स्त्रीस खाली उतरविले.

ही दुसरी तरुण स्त्री म्णजे करुण रसाची मूर्तीच दिसली. अगदी शुभ्र असे एक वस्त्र ती नेसली होती. गळ्यात एक मोत्यांचा सर व हातात एक एकच कंकण होते. यावेळी तिच्या नेत्रांतून अश्रू मुळीच येत नव्हते. परंतु एकवार त्यांचा पूर वाहून आता त्या विशाल सुंदर नेत्रांत अश्रू म्हणून राहिलाच नाही असे दिसत होते, किंवा आता अश्रू नेत्राबाहेर येऊच द्यावयाचे नाहीत; असा निश्चय करूनच तिने ते अगदी आतल्या आत दाबून टाकले असावेत, असे दिसले म्हटले तरी चालेल. तिच्या त्या दुःखाविष्ट चर्येवर आपले दुःख दुसऱ्याला दिसू द्यावयाचे नाही, असा तिच्या मनाचा निश्चय पूर्णपणे दिसत होता. तिला गाडीतून उतरून घेणारी स्त्री लागलीच तिला घेऊन त्या राखेच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन मोठ्याने आक्रंदन करू लागली. तो वृद्ध रजपूत सरदारही एका बाजूस जाऊन स्वस्थपणे उभा राहिला. त्याचप्रमाणे त्याच्या बरोबरचे भिल्ल दूर उभे राहिले आणि दुसरे रजपूत शिपाई होते ते त्या वृद्ध रजपुताजवळ जाऊन अदबीने उभे राहिले. प्रत्येकाच्या चर्येवर दुःखाची छाया स्पष्ट दिसतच होती. ती बावीस-तेवीस वर्षांची स्त्री खेरीज करून कोणाच्याही तोंडातून शोकोद्गार बाहेर मात्र पडत नव्हते. ती तेवढी 'वीरसिंहजी, वीरसिंहजी! कसे आम्हाला टाकून गेलात! महाराजांची सेवा करावयाची एवढ्याकरिताच आपला जन्म ही गोष्ट खरी, पण तेवढ्याकरिता आपला जीव धोक्यात घालण्याचे मुळीच कारण नव्हते. तुम्ही आपल्या बायकोला, आम्हाला, आपल्या वडिलांना कंटाळला म्हणून असे साहस केले काय?...' असे शोकोद्गार काढून ती मोठ्याने आक्रंदन करू लागली.

ती दुसरी तरुण स्त्री–वयाने वीस वर्षांची असेल नसेल– तिने एकवार खाली वाकून त्या राखेच्या ढिगाला वंदन केले व त्यातील एक चिमूटभर राख घेतली आणि आपल्या कपाळास लावली. तितक्यात तिच्या डोळ्यांतून टप्‌टप्‌ अश्रू पडू लागले आणि हुंदकाही बाहेर पडणार, तो तिने अत्यंत प्रयत्नाने दाबून धरला. नंतर लागलीच तिने आपले अश्रूही पुसले आणि मोठा धीर करून अगदी शांतपणे त्या मैत्रिणीजवळ जाऊन तिने उठण्यासाठी तिचा हात धरून ती म्हणाली, 'देवलदेवी, मी तुला बरोबर आणली, मांजीला येऊ दिले नाही, ते तू येथे येऊन रडण्यासाठी की माझी लवकर रवानगी करण्यासाठी? पिताजी, तुम्ही आता उशीर करता आहात? या भिल्लांना चिता रचण्यासाठी इंधन आणण्याला का सांगत नाही? या मथुरानाथजी, तुम्ही उपाध्ये आहात, तुम्ही मला मंत्र सांगून माझी बोळवण कराल म्हणून बाबांच्याकडून मी तुम्हाला मुद्दाम आणले. आता कोणी रडू नका. मला तिकडच्या दर्शनाची अगदी गर्दी झाली आहे. तुम्ही जो जो उशीर करता आहात, तो तो माझ्या मनाला वेदना होताहेत. त्या वेदना का होऊ देता? चल ऊठ, ऊठ देवल, असा आळस का करतेस?'

ते तिचे धिटाईचे बोलणे ऐकून सर्वांना फार आश्चर्य वाटले असावे; कारण संग्रामसिंह घरून कमलकुमारीला घेऊन निघाला, तेव्हा त्याला अशी आशा वाटत होती की, या स्थानी आल्याबरोबर किंवा येता येता वाटेतच कमलकुमारीचा आपल्या पतीबरोबर सहगमन करण्याचा निश्चय डगमगेल; परंतु आता तसा काहीच प्रकार दिसेना, तेव्हा त्याची त्या बाबतीत निराशा झाली आणि त्यास मुळीच धैर्य न राहून तो अगदी एखाद्या स्त्रीप्रमाणे रडण्याच्या बेतात आला.

कमलकुमारी ही संग्रामसिंहाची एकुलती एक मुलगी. ती त्याने मेवाडचा राणा राजसिंह यांच्या घराण्यातील वीरसिंह नावाच्या एका पुरुषास दिली होती. वीरसिंह हा राजसिंहाच्या फार मर्जीतला असून मोगलांचा मोठा द्वेष्टा. राणा राजसिंह याचे ठिकाणी त्याची इतकी भक्ती होती–नव्हे निष्ठा होती की– 'वीरसिंहा, तू आपले शिर कापून ठेव' म्हणून त्याने त्याला आज्ञा केली असती, तरीसुद्धा याने यत्किंचित्‌ मागे पुढे न पाहता ती अंमलात आणली असती. अशा तऱ्हेची स्वामी भक्ती ज्याच्या ठिकाणी जागृत होती, त्याच्यावर स्वामींची कृपा असली तर त्यात नवल काय? आपल्यास मोगलांचे पारिपत्य करण्याची संधी यावी, ही वीरसिंहाची मोठी महत्त्वाकांक्षा आणि ती तृप्त होण्याकरिता राजसिंहापासून हद्दीवरचे काम त्याने मागून घेतले होते. औरंगजेबाला राजसिंहाचे राजपुतान्यातील वर्चस्व पाहून फार वैषम्य वाटत असल्यामुळे त्याने आपले

हेर व काही सैन्य मेवाडच्या हद्दीवर नाना ठिकाणी ठेवून संधी साधेल तेव्हा त्याच्या राज्यात शिरकाव करण्याविषयी त्यांना हुकूम देऊन ठेवले होते. राजसिंहाच्या मनात आपल्या राज्यात या लोकांचा शिरकाव यत्किंचितसुद्धा होऊ देऊ नये असे असल्यामुळे त्याने हद्दीवर ठिकठिकाणी ठाणी ठेवून ती चांगल्या शूर अशा रजपुतांच्या ताब्यात दिली होती. त्यात अरवलीच्या वाटांपैकी एका अत्यंत अवघड अशा जागी वीरसिंहास ठेवले होते. त्या ठिकाणी वीरसिंह असताना त्याने कशा प्रकारचे धाडस केले आणि काय झाले हे वाचकांस पद्मनाभजींच्या भाषणावरून समजले आहेच. वीरसिंह त्या आपल्या ठाण्यावर आला तेव्हा त्याने आपल्या पत्नीस बरोबर आणले नाही. अर्थातच त्याचा तसा शेवट झाल्यानंतर सुमारे आठ दिवसांनी तिला व तिच्या आईला ती दुःखवार्ता कळली. ती वार्ता ऐकल्याबरोबर कमलकुमारीने सती जाण्याचा कृतनिश्चय केला. सती जाण्यास पतीचे शव पाहिजे परंतु ते तर त्याच्या बरोबरच्या लोकांनी दहन करून नंतर ते त्याची निधनवार्ता सांगण्याला आले. तेव्हा ज्या ठिकाणी पतीच्या शवाचे दहन झाले, त्याच ठिकाणी जाऊन पतीची प्रतिमा करून त्या प्रतिमेबरोबर किंवा त्याच्या पादुका घेऊन त्याबरोबर सती जाण्याचा तिने निश्चय केला.

अकबर बादशहाने सती जाणे बंद करण्यासाठी पुष्कळ खटाटोप केला; परंतु त्यात त्यास यावे तसे यश आले नाही. क्षत्रियांच्या स्त्रिया पतीबरोबर सहगमन करण्याविषयी नेहमी उत्सुक. त्याच्या मृत्यूनंतर आपण जगात राहणे म्हणजे पापलोकात राहून त्याच्याही आत्म्यास येथेच अडकवून ठेवण्यासारखे होय, असे प्रत्येक साध्वीला वाटत असे व ती मोठ्या आनंदाने आत्मदहन करून घेत असे. कमलकुमारी तशीच मोठी निश्चयी व पतिनिष्ठ स्त्री होती. पतीची मृत्युवार्ता ऐकताक्षणीच तिने वर सांगितल्याप्रमाणे निश्चय केला आणि ताबडतोब सती जाण्यास निघण्याविषयी आग्रह चालविला. एकुलती एक कन्या आपल्या डोळ्यांदेखत अग्निसात व्हावी, असे कोणा आईबापांना वाटणार आहे? तेव्हा त्यांनी व इतर आप्तेष्टांनी आणि मैत्रिणींनी तिला आपला निश्चय सोडून देण्याबद्दल पुष्कळ सांगितले, परंतु तिने आपला एकच हेका धरला. सगळ्यांनी नाना प्रकारांनी तिची समजूत केली. कोणी पुराणांतरी सती न जाता राहिलेल्या कुंती आदिककरून स्त्रियांच्या कथा सांगितल्या, पण सर्व व्यर्थ गेले. तिचा निश्चय अगदी कायम. 'तुम्ही मला तेथे नेऊन सती जाऊ दिले नाही, तर मी अन्नपाणी वर्ज्य करून प्राणघात करीन.' असे तिने स्पष्ट सांगितले व त्याप्रमाणे करण्याखेरीज दुसरा काही इलाज नाही, असे पाहून तिच्या म्हणण्यास संग्रामसिंहाने रुकार दिला.

आपल्याबरोबर कोणी माणसांनी येऊ नये, माजी–आईने–तर मुळीच येऊ नये, ती आल्याने विनाकारण मोह उत्पन्न होईल असाही तिने आग्रह धरला. सती जावयाचे ते वाजतगाजत, पुष्कळ लोक पोहोचविण्यासाठी बरोबर असून असे जावयाचे, परंतु कमलकुमारीने 'त्यापैकी काहीही आपल्याला नको.' असा हट्ट धरला. सर्व बाबतीत संग्रामसिंहाने तिच्या इच्छेप्रमाणे करण्याचा बेत करून एक तिची मैत्रीण देवलदेवी, एक मथुरानाथ उपाध्याय मंत्र सांगण्यासाठी तोही शूर शिपाईच होता; दुसरे पद्मनाभजी जे वीरसिंहाबरोबर होते ते, दोन शूर रजपूत कडवे शिपाई व चार भिल्ल वाटाडे, इतकीच मंडळी घेऊन तिला प्रारंभी सांगितलेल्या गाडीत बसवून वीरसिंहाच्या दहनस्थानाजवळ तो आला. ते स्थान पाहण्याबरोबर काय प्रकार झाला, तो वर आलाच आहे.

आणखी एकवार आपण आपले वजन खर्च करून जर काही झाले तर पाहावे आणि तिचे मन वळवावे म्हणून देवलदेवी आपला शोक आवरून कलमकुमारीला म्हणते, 'कमल, तू काही वेडीबिडी तर आहेस, अशा वयात सती जाण्याचा हट्ट धरतेस तो? भगवान एकलिंगजीच्या सेवेत आपला राहिलेला आयुष्यक्रम घालविला तर काय थोडे पुण्य लागेल? पिताजींना, माजींना तू सती गेल्याने किती दुःख होणार आहे त्याबद्दल तुला काहीसुद्धा वाटत नाही ना? तू एकुलती एक मुलगी, तुझ्यावर सर्वांचा जीव की प्राण, आणखी तू जर अशी प्राण देऊ लागलीस तर त्यांनी काय करावे? वेडे, त्यांच्या दुःखाकडे तुला पाहावयाला नको का?'

ते ऐकून कमलकुमारी एकदम हसून म्हणते, 'देवल, तुझ्या बोलण्याचा बाई मला मोठा चमत्कार वाटतो. काय म्हणतेस? पिताजींना आणि माजींना मी सती गेल्याने वाईट वाटेल, आणि मी भद्रकपाळी वैधव्याचा कलंक लावून घेऊन मरेपर्यंत रोज त्यांच्या अशी नजरेसमोर राहिल्याने त्यांना संतोष होईल, असं म्हणतेस? देवल, या तुझ्या बोलण्यानेच तू वेडी का मी वेडी ते समजलं. ऊठ, आता ही असली वेडगळ बोलणी बोलू नकोस. माझी तयारी कर. त्या भिल्लांना इंधन आणायला सांग. बाबांना काही त्रास पडू देऊ नकोस. हे दुसरे दोघे आणखी पद्मनाभजी ती चिता रचतील. मथुरानाथजी, प्रतिमा करिता की बरोबर आणलेल्या पादुका काढू? तुम्ही जसं सांगाल तसं करीन. पण हे हो काय? तुम्ही रडायला लागला! या देवलदेवीनं तुम्हाला सगळ्यांना रडायला लावलं. हिला मी कोठून आणली असं मला झालं आहे. मी एकटी आले असते तर बरं झालं असतं.'

'साध्वी कमलकुमारी,' मथुरानाथ अत्यंत गदगदित कंठाने म्हणतात, 'तुझ्यापुढे आम्ही काय माणसं? तुझं धैर्य पाहून आम्ही अगदी चकित झालो. तुझा निश्चय तोच तुझा मंत्र. तुला आमच्या वैदिक मंत्रांनी अधिक फलप्राप्ती काय होणार आहे? संग्रामसिंह, तुमच्या पोटी ही कमलकुमारी नव्हे, कोणतीतरी महादेवी उगीच जगताची लीला पाहण्यास आली आहे, असं समजून तुम्ही आपल्याला धन्य माना आणि खरोखरच आपला शोक एका बाजूला सारून आता हिच्या पाठवणीच्या तयारीला लागा. जा रे, ए भिल्लहो, इंधन आणून देण्याचं पुण्य तुम्ही घ्या. देवल, आता शोक आवर. कमलकुमारी सामान्य स्त्री नव्हे. शाबास साध्वी, तुझ्यासारख्याचं पुण्य तेच राजसिंहांचं पुण्य. तुझ्यासारख्या स्त्रिया जोपर्यंत मेवाडात आहेत, तोपर्यंत या मेवाडाकडे वाकडी नजर करून तरी कोणाची पाहण्याची छाती होईल काय? चला, आता आपण सगळेजण शोक आवरू आणि पुढच्या उद्योगाला लागू. आमची तरी पुण्याई जबर म्हणून आम्ही या प्रसंगी इथे आलो.'

असे म्हणून मथुरानाथजी त्या बैलगाडीजवळ गेला व त्यात जे काय साहित्य आणले होते ते त्याने भराभर बाहेर काढले. देवलदेवी अजून तशीच स्वस्थ शोक करीत बसली होती. तिला त्याने लवकर शोक आवरण्याविषयी निक्षून सांगितले आणि हाती धरून उठविलेच. तीही आता शुद्धीवर आली होती. आपली प्रिय मैत्रीण कमलकुमारी आता सती गेल्याखेरीज राहात नाही, असे तिला पक्के वाटले; तेव्हा तिने आपला शोक आवरला आणि ती तिला मदत करण्यासाठी पुढे सरसावली. सतीस लागणारे सगळे सामान कमलकुमारीने आपल्या बरोबरच घेतले होते. तिला या सर्व साहित्याची माहिती तरी कशी झाली याचेच मथुरानाथास फार आश्चर्य वाटले. परंतु जी सती जाण्याच्या निश्चयाने आली, तिला काय सुचवायचे नाही? असे मनात म्हणून त्याने देवलदेवीच्या हातात एक रक्तवस्त्र दिले व ते वस्त्र कमलकुमारीला नेसव असे सांगितले. नंतर तिच्या कपाळी मळवट वगैरे भरण्याला, भांगात कुंकू टाकून फुले गुंफण्याला वगैरे सांगून ते स्वतः चितेकडे गेले. ज्यावर सती जावयाची ती चिता काही विवक्षित तऱ्हेने रचावयाची असते. त्याप्रमाणे ती सर्वांनी मिळून रचली. भिल्लांनी पर्वतातून वाळलेली चंदनाची लाकडेच बहुतेक आणून टाकली होती. अशा तऱ्हेने चिता तयार झाल्यानंतर मथुरानाथजीने 'एकवार आपल्या बापाला भेट, देवलदेवीला भेट, आपल्या मातेचे स्मरण कर आणि त्या पादुका हातात घे.' असे कमलकुमारीस सांगितले.